# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Sakaal 01-02-2016**

# 'स्टिकर' असलेल्या वाहनांनाच कॉलेजात प्रवेश

## जीआयटीचा नवीन उपक्रम : प्रायोगिक तत्त्वावर सुरू, आगामी शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

सुनील गावडे : सकाळ वृत्तसेवा

बेळगाव, ता. ३१ : विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची सवय लावण्यासाठी नेहमीच वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने (जीआयटी) आता आणखी उपक्रम हाती घेतला आहे. कॉलेज आवारात येणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वाहनांना स्टिकर्स लावले जाणार आहेत. अन् भविष्यात स्टिकर्स असलेल्या वाहनांनाच आवारात प्रवेश दिला जाणार आहे. सध्या तरी चारचाकी वाहनांना स्टिकर्स लावून प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम सुरू झाला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून तो सर्व वाहनांना लागू केला जाईल.



जीआयटी कॉलेज.

> जीआयटी व्यवस्थापनाने नेहमीच विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच वाहन चालविताना त्यांनी नियमांचे पालन करावे, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी हेल्मेटसक्ती, वाहनांना स्टिकर्स आदी उपक्रम आहेत. विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम पाळावेत, त्यांची तातडीने ओळख पटावी, प्रवेशद्वारावर त्यांची अडवणूक होऊ नये आदी कारणांसाठी स्टिकर्स लावण्याचा निर्णय घेतला आहे.
> 
> - डॉ. आनंद देशपांडे, प्राचार्य, जीआयटी.

यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जीआयटी व्यवस्थापनाने कॉलेज आवारात हेल्मेटसक्ती करून वेगळा पायंडा पाडला होता. या सक्तीमुळे सुमारे ६० टक्क्यांहून अधिक मुलांनी हेल्मेट वापरण्यास सुरवात केली होती. परंतु, काही विद्यार्थी आवाराबाहेर वाहने पार्क करू लागल्याने सामाजिक समस्या निर्माण झाली. औद्योगिक संघटना व स्थानिक रहिवाशांनी तक्रार केल्यानंतर जीआयटीने ही सक्ती मागे घेतली होती. पण, या सक्तीमुळे कॉलेजमधील निदान ३० टक्के मुले आता नियमित हेल्मेट वापरू लागली आहेत. या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहून व्यवस्थापनाने नवीन उपक्रम हाती घेतला आहे.

आवारात दुचाकी वा चारचाकी वाहन आणणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापकांना कॉलेजतर्फे एक स्टिकर देण्यात येणार आहे. या स्टिकरवर कॉलेजचे नाव, विभागाचा संकेतांक, अनुक्रमांक व कॉलेजचा दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असेल. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थी व प्राध्यापकाला वाहन नोंदणी कागदपत्र व वाहन चालविण्याच्या परवान्याची छायांकित प्रत कॉलेजमध्ये जमा करावी लागणार आहे. प्रत्येकाकडे रितसर कागदपत्रे व परवाना असल्याची खात्री पटल्यानंतरच त्यांना स्टिकर दिले जाणार आहे. त्याची वेगळी नोंद ठेवली जाणार आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांनी हे स्टिकर आपल्या वाहनावर दिसेल अशा ठिकाणी लावायचे आहे. सध्या तरी प्रायोगिक तत्त्वावर चारचाकी वाहनधारकांना स्टिकर्स देण्यात आली आहेत. स्टिकर असलेल्या वाहनांनाच कॉलेज आवारात प्रवेश दिला जात आहे. तसेच सीट बेल्टही बंधनकारक केला आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून दुचाकींनाही हा नियम लागू होणार आहे.